Dt. 25-07-2013

राजर्षी शाहू महाविद्यालय परीक्षा मंडळाची बैठक दिनांक 25-07-2013 रोजी सायंकाळी ठीक 05.00 वा. प्राचार्यांच्या दालनात प्राचार्य डॉ. एस. बी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली बैठकीस खालील सदस्य उपस्थीत होते.

1) डॉ. एस. बी. जाधव
2) डॉ. एस. डी. साळुंके
3) प्रा. व्ही. आर. दाडगे
4) प्रा. बी. एस. चंद्रवंशी
5) डॉ. व्ही. एस. शेवेकर
6) प्रा. के. एम. प्रधान

बैठकीचे प्रास्ताविक परीक्षा मंडळाचे सचिव प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी केले. बैठक इतिवृत्त रजीस्टरवर उपस्थितांच्या स्वाक्षऱ्या घेतल्यानंतर बैठकीस रितसर सुरुवात करण्यात आली.

विषय क्र. 01 : विद्यार्थ्यांच्या वर्गातील उपस्थितीसाठी गुण देणे.

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन 40% अंतर्गत (Internal) परीक्षेद्वारे व 60% बहिर्गत (End Semester) परीक्षेद्वारे केले जाणार आहे. पदवी वर्गासाठी प्रत्येक सेमिस्टरमध्ये एक पेपर 50 गुणांचा आहे. त्यातील 20 गुण अंतर्गत मूल्यमापनातून खालीलप्रमाणे देण्यात येणार आहेत.

01 युनिट टेस्टसाठी 15 गुण
02. वर्गातील उपस्थिती 05 गुण

वर्गातील उपस्थितीचे 05 गुण खालीलप्रमाणे दिले जातील

| वर्गातील उपस्थितीचे प्रमाण (%) | गुण |
|---|---|
| (Below) 75% पेक्षा कमी उपस्थिती | 00 |
| 75 ते 79.99 | 01 |
| 80 ते 84.99 | 02 |
| 85 ते 89.99 | 03 |
| 90 ते 94.99 | 04 |
| 95 ते 100.00 | 05 |

विषय क्र. 02 : युनिट टेस्ट व सेमिस्टर अखेर परीक्षा स्वरूप व संभाव्य तारीख :

01) अंतर्गत मूल्यमापनाचे 15 गुण देण्यासाठी प्रत्येक सेमिस्टरमध्ये दोन युनिट टेस्ट घेतल्या जातील.

02.) प्रत्येक युनिट टेस्ट 30 गुणांची राहील.

03) दोन्ही युनिट टेस्टमध्ये विद्यार्थ्याने मिळवलेल्या गुणांची सरासरी काढून त्याचे रूपांतर 15 गुणांपैकी करून अंतिम गुण दिले जातील.

04) प्रथम युनिट टेस्ट :-

प्रथम युनिट टेस्ट 50% अभ्यासक्रमावर आधारीत असेल.
पदवी वर्गाची प्रथम युनिट टेस्ट दि. 26 ऑगस्ट 2013 पासून सुरू होईल.
पदव्युत्तर वर्गाची प्रथम युनिट टेस्ट दि. 02 सप्टेंबर 2013 पासून सुरू होईल.
प्रथम युनिट टेस्टसाठी विद्यार्थ्यांना 01 तासाचा वेळ राहील.
प्रथम युनिट टेस्टसाठी प्रश्नपत्रीकेचे स्वरूप खालील प्रमाणे राहील :-

| स्वरूप | गुण |
|---|---|
| 1) पाच प्रश्न अनिवार्य प्रत्येकी दोन गुण | 10 |
| 2) चार पैकी दोन प्रश्न सोडवा प्रत्येकी पाच गुण | 10 |
| 3) दोन पैकी एक प्रश्न सोडवा | 10 |
| एकूण गुण | 30 |

प्रथम युनिट टेस्टसाठी 12 पेजेसची उत्तर पत्रीका राहील पूरवणी देण्यात येणार नाही. प्रथम युनिट टेस्टसाठी प्रश्नपत्रीकेचे दोन सेट दि. 15 ऑगस्ट 2013 पर्यंत परीक्षा विभागात जमा करावेत.

05) द्वितीय युनिट टेस्ट :-

द्वितीय युनिट टेस्ट पुर्ण अभ्यासक्रमावर आधारीत असेल.
पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्ष वर्गाची द्वितीय युनिट टेस्ट दि. 21 ऑक्टोबर 2013 पासून सुरू होईल.
द्वितीय युनिट टेस्टचा वेळ 45 मिनीटांचा राहील व प्रश्नपत्रीका 30 वस्तुनिष्ठ प्रश्नांची राहील.
द्वितीय युनिट टेस्ट MCQ पॅटर्ननुसार होईल. मूल्यांकन निगेटिव्ह मार्कींग सिस्टीमनुसार असेल. प्रत्येक चार चुकीच्या

द्वितीय युनिट टेस्ट उत्तरपत्रीका मूल्यांकन परीक्षा विभाग मार्फत होईल.
द्वितीय युनिट टेस्टसाठी प्रश्नपत्रीकेचे दोन सेट दिनांक 30 सप्टेंबर 2013 पर्यंत परीक्षा विभागात जमा करावेत

6) सेमिस्टर अखेर (Semester End Exam) परीक्षा :

पदवी व पदव्युत्तर वर्गाची सदर परीक्षा दिनांक 06 ते 16 नोव्हेंबर 2013 दरम्यान संपन्न होईल. सेमिस्टर अखेर परीक्षेसाठी 12 पेजसूची उत्तरपत्रीका राहील. मागणीप्रमाणे पुरवणी दिली जाईल.
सेमिस्टर अखेर प्रश्नपत्रीकेचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील :-

| स्वरूप | गुण |
|---|---|
| MCQ प्रश्न अनिवार्य | 10 |
| चार पैकी दोन प्रश्न सोडवा लघुत्तरी प्रत्येकी पाच गुण | 10. |
| दोन पैकी एक प्रश्न सोडवा दीर्घोत्तरी | 10. |
| एकूण | 30. |

वेळ 1.30 तास (पदवी)
वेळ 2.00 तास (पदव्युत्तर)
टिप - पदव्युत्तर वर्गासाठी उपस्थितीचे गुण व प्रश्नपत्रिकेचे गुणांचे स्वरूप पदवी वर्गाच्या दुप्पट राहील.

7) प्रथम सेमिस्टर अखेर प्रात्यक्षिक परीक्षा दि 28 ते 31 ऑक्टोबर दरम्यान संपन्न होईल.

विषय क्र 03 . परीक्षासंदर्भातील इतर निर्णय :-

01) बायोटेक्नॉलॉजी विद्यार्थ्यांची युनिट टेस्ट व सेमिस्टर अखेर परीक्षा राजर्षी शाहू महाविद्यालय चंद्रनगर येथेच होईल
02) युनिट टेस्ट / सेमिस्टर अखेर परीक्षेचे पर्यवेक्षण सर्व प्राध्यापकांना बंधनकारक राहील.
03) युनिट टेस्ट व सेमिस्टर अखेर प्रश्नपत्रीकांचे प्रुफ रिडींग परीक्षा विभागामार्फत केले जाईल.
04) प्राचार्यांच्या पूर्वपरवानगीने एन.सी.सी./ एनएसएस/ सांस्कृतिक/ अविष्कार / ट्रेनिंग कोर्स आणि इतर उपक्रमात सहभागी आल्यामुळे विद्यार्थी जर महाविद्यालयाची नियोजीत युनिट टेस्ट देऊ शकला नाही तर त्याची युनिट टेस्टची परीक्षा प्राचार्यांच्या पूर्वपरवानगीने घेतली जाईल.
05) अंतर्गत व बहीर्गत दोन्ही परीक्षेच्या एकत्रीत गुणांचा

06) सेमिस्टर अखेर परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची अंतर्गत परीक्षा नव्याने घेतली जाणार नाही, त्याचे अंतर्गत परीक्षेचे पूर्वीचेच गुण गृहीत धरले जातील.

07) सेमिस्टर अखेर परीक्षेच्या पेपर सेटींगसाठी विषयनिहाय पॅनल तयार ~~करून~~ करण्यासाठी बोर्ड ऑफ स्टडीजकडून इतर महाविद्यालयातील प्राध्यापकांचे नाव त्वरीत मागवून घ्यावीत.

08) पेपर सेटींग रिव्हीव कमीटी : प्रश्नपत्रीकेबाबत काही प्रश्न निर्माण झाला तर संबंधित विषयाचे विभाग-प्रमुख, शाखा समन्वयक, परीक्षा नियंत्रक अतिरीक्त परीक्षा नियंत्रक एकत्रीत बैठक घेऊन निर्णय घेतील. पेपर सेटिंग अंतर्गत व बहिस्थ प्राध्यापकांकडून केले जाईल.

09) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यास जुन्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देण्यासाठी संधी देणे तसेच ATKT आदी विषय निर्णयासाठी वेगळी बैठक घेण्यात यावी.

10) ग्रेडींग पद्धत पुढील प्रमाणे स्वीकारावी असे ठरले.

Conversion of marks to Grade Points and Letter Grade.

(Performance in a Paper/course) U.G. and P.G.

| Range of Marks | Grade Points | Letter Grade | Description |
|---|---|---|---|
| 90-100 | 9.0-10.0 | O++ | Outstanding |
| 80-89 | 8.0-8.9 | O+ | Excellent |
| 75-79 | 7.5-7.9 | O | Distinction |
| 70-74 | 7.0-7.4 | A+ | Very Good |
| 60-69 | 6.0-6.9 | A | Good |
| 55-59 | 5.5-5.9 | B+ | Average |
| 50-54 | 5.0-5.4 | B | Average |
| 40-49 | 4.0-4.9 | C | Satisfactory |
| 00-39 | 0.0 | F | Re-appear |
| Absent | 0.0 | AA | Absent. |

n refers to the semester in which such coursess

For a Semester :

Grade Point Average [GPA] = Sum of multiplication of grade points by the credits of the courses. / Sum of the credits of the courses (Passed) in a Semester.

$$GPA = \frac{\sum c_i G_i}{\sum c_i}$$ where - $c_i$ = credits earned for course/in any semester.

- $G_i$ = Grade point obtained for course/in any semester.

For the entire Programme :

Cumulative Grade Point Average [CGPA] =

CGPA = Sum of the multiplication of grade points by the credits of the entire programme. / Sum of the credits of the courses of the entire programme.

Overall Performance :

| CGPA U.G. | Grade U.G. | Classification of Final Result U.G. |
| --- | --- | --- |
| 9.5 – 10.0 | O | First class with Distinction * |
| 9.0 and above but below 9.5 | | |
| 8.5 and above but below 9.0 | | |
| 8.0 and above but below 8.5 | | |
| 7.5 and above but below 8.0 | | |
| 7.0 and above but below 7.5 | A | First Class |
| 6.5 and above but below 7.0 | | |
| 6.0 and above but below 6.5 | | |
| 5.5 and above but below 6.0 | B+ | Higher Second class |
| 5.0 and above but below 5.5 | B | Second class |
| 4.0 and above but below 5.0 | C | Third class |

* Applicable to candidates who have passed the courses prescribed for the Programme in the first appearance as per the scheme of examination; otherwise they are eligible for classification only.

अशाप्रकारे बैठकीचे कामकाज होऊन अध्यक्षांच्या परवानगीने बैठक स्थगीत करण्यात आली.

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय
लातूर

23-11-2013

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) परीक्षा मंडळाची बैठक दि. 23-11-2013 रोजी सायं ठीक 05.00वा. महाविद्यालयात घेण्यात आली.

बैठकीस खालील सदस्य उपस्थीत होते.

01. प्राचार्य अनिरुध्द जाधव
02. डॉ. आर. एल. कावळे
03. डॉ. एस. बी. जाधव
04. डॉ. पी. एन. सगर
05. प्रा. व्ही. आर. दाडगे
06. प्रा. बी. एस. चंद्रबन्सी
07. श्री. व्ही. डी. धुमाळ

बैठकीत खालील निर्णय घेण्यात आले.

विषय 1. उत्तरपत्रीकांचे मूल्यांकन सेमिस्टर एण्ड परीक्षा :-

अ) सध्या ठरविलेल्या पध्दतीनुसार या परीक्षेच्या उत्तरपत्रीकांचे मूल्यांकन सुरु ठेवावे

ब) कोणत्याही परिस्थीतीत निकाल नियोजीत वेळेत लागला पाहिजे. ॲसेसमेंटसाठी नियोजीत प्राध्यापक अनुपस्थित राहिले तर आयत्यावेळी उपलब्ध होणाऱ्या प्राध्यापकांना बोलाऊन काम पुर्ण करुन घेण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील.

क) 15 % पेक्षा अधिकच्या फरकाचे रेकॉर्ड परीक्षा विभागाने ठेवावे

ड) परीक्षा विभागात काम करणाऱ्या सर्व प्राध्यापक/कर्मचाऱ्यांचा गोपनिय अहवाल वर्षाच्या शेवटी परीक्षा विभागाने प्रशासनास सादर करावा

विषय क्र 2. स्किम ऑफ मार्कींग :-

स्किम ऑफ मार्कींगसाठी वर्कशॉप घ्यावे. मार्गदर्शनासाठी शहराबाहेरील तज्ञांना बोलवावे.

बैठकीत उपस्थीत सदस्यांनी खालील प्रमाणे

दि. 23-11-2013

अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करावा.

अ) प्राचार्य अनिरुद्ध जाधव :-

1) आपली ॲसेसमेंट पध्दत पारदर्शक व न्यायपूर्ण असावी.
2) शक्यतो सींगल ॲसेसमेंट असावे. या ॲसेसमेंटसाठी शक्यतो सर्व प्राध्यापक इतर महाविद्यालयातील बोलवावेत.
3) डबल ॲसेसमेंटमुळे निकालास उशीर होऊ नये याची काळजी घ्यावी.
4) दुसऱ्या ॲसेसमेंटसाठी इतर महाविद्यालयातील व सर्व विषयासाठी प्राध्यापक मिळतील का?
5) उत्तरपत्रीकेवर मूल्यांकन ~~कष्ट~~ तपासणीच्या काहीच खुणा नसणे ही पध्दत अयोग्य वाटते.
6) परीक्षा संपताच विद्यार्थ्यांनाही स्किम ऑफ मार्कींग (Answer Key) दयावी.
7) किमान 20% उत्तरपत्रीकांचे मॉडरेशन करावे. मॉडरेशनसाठीचे सर्व प्राध्यापक इतर महाविद्यालयातीलच असावेत.
8) निकालानंतर उत्तरपत्रीका संबधित विद्यार्थ्यांना दाखवावी. मूल्यांकन तपासणीबाबत विद्यार्थ्यांची तक्रार असेल तर योग्य शुल्क आकारुन रिॲसेसमेंट करावे.
9) नविन योजना राबविताना विशिष्ट बजेटच्या आत पुर्ण व्हावी.

ब) डॉ. आर. एल. कावळे :-

1) तिसऱ्यांदा ॲसेसमेंट करणाऱ्या प्राध्यापकाचा निर्णय अंतिम मानणे हे सर्वस्वी योग्य नाही.
2) इतर महाविद्यालयातून पेपर सेटींग / मूल्यांकनासाठी बोलावण्यात येणाऱ्या प्राध्यापकांकडून मी हा पेपर शिकवलो अशा आशयाचे हमीपत्र लिहून दयावे.
3) डबल ॲसेसमेंट पध्दतीसाठी प्रत्येक उत्तरपत्रीकेचे झेरॉक्स काढून ॲसेसमेंट केले तर ते कमी वेळेत पुर्ण होईल. खर्च वाढत असला तरी हे काम करावे. आवश्यकतेनुसार परीक्षा शुल्कातही यासाठी वाढ करण्यास हरकत नाही.
4) डबल ॲसेसमेंट पध्दत ठेवावी. दोन ॲसेसमेंट मध्ये 15% पेक्षा अधिकचा फरक असेल तर दोघांची सरासरी काढून गुण दयावेत. तिसऱ्यांदा ॲसेसमेंट करु नये.

क) डॉ. पी. एन. सगर :-

23-11-2013

पद्धतीबद्दल बैठकीत माहिती दिली.

2) डबल असेसमेंटमुळे आपल्याही प्राध्यापकांवर नैतिक दबाव राहतो त्यामुळे ते काळजीपूर्वक असेसमेंट करतील.

3) इतर महाविद्यालयातील प्राध्यापक कोणता पेपर शिकवतात याची शक्यता आपल्या प्राध्यापकांना माहिती असते. एपीआय स्कोर सुधारण्यास मदत होणार असल्यामुळे इतर महाविद्यालयातील प्राध्यापक आपल्याकडे असेसमेंटसाठी येण्यास उत्सुक असतात.

4) महाविद्यालयाच्या वतीने विद्यापीठाला पत्र पाठवून असे परिपत्रक काढण्याची विनंती करावी की, या महाविद्यालयात परीक्षेच्या कामासाठी येणाऱ्या प्राध्यापकांना कर्तव्य रजा मंजूर करण्यात येईल.

अशाप्रकारे बैठकीचे कामकाज होऊन बैठकीचा समारोप करण्यात आला.

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय
लातूर

16-12-2013

राजर्षी शाहू महाविद्यालय स्वायत्त परीक्षा मंडळाची बैठक दि. 16-12-2013 रोजी सकाळी ठीक 11.00 वा. महाविद्यालयातील कॉन्फरन्स हॉलमध्ये घेण्यात आली.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

01. प्राचार्य अनिरुद्ध जाधव
02. डॉ. आर. एल. कावळे
03. डॉ. एस. बी. जाधव
04. डॉ. पी. एन. सगर
05. डॉ. एस. डी. साळुंके
06. प्रा. व्ही. आर. दाडगे
07. प्रा. बी. एस. चंद्रवंशी

प्रास्ताविक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी केले. परीक्षा विभागामार्फत आजपर्यंत झालेल्या व सुरू असलेल्या कामाची त्यांनी बैठकीत थोडक्यात माहिती सादर केल्यानंतर बैठकीस रितसर सुरुवात करण्यात आली.

विषय क्र. 01: मागील बैठकीचे इतिवृत्त वाचन.

परीक्षा मंडळाची मागील बैठक दि. 23-11-2013 रोजी संपन्न झाली होती. त्या बैठकीत झालेल्या निर्णयाची माहिती व इतिवृत्ताचे वाचन प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी केले त्यावर साधक-बाधक चर्चा होऊन सदर इतिवृत्तास एकमताने मान्यता देण्यात आली.

विषय क्र. 02: प्रथम सत्रांत परीक्षेचे निकाल वाचन.

स्वायत्त महाविद्यालयांतर्गत पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्षाची प्रथम सत्रांत परीक्षा दिनांक 07 ते 17 नोव्हेंबर 2013 पर्यंत महाविद्यालयात संपन्न झाली. सदर परीक्षेच्या निकालाचे वाचन परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे व अतिरिक्त परीक्षा नियंत्रक प्रा. बी. एस. चंद्रवंशी यांनी केले. बी. कॉम, एम. ए. भूगोल एम. एस्सी फिजीक्स फॉरेन्सिक्स, बी. एस्सी. सी. एस या वर्गाशिवाय इतर सर्व वर्गाचे निकाल असमाधानकारक आहेत. सदर निकालावर उपस्थित सदस्यांनी खालीलप्रमाणे आपली मते व्यक्त केली.

प्राचार्य अनिरुद्ध जाधव.

1. निकाल समरीमध्ये रजिस्टर्ड विद्यार्थ्यांचा कॉलम वाढवावा

16.12.2013

3. सल्लागार समिती / स्टाफ बैठकीमध्ये निकाल कमी लागल्याबाबतची कारणे कोणती आहेत याची चर्चा करावी.
4. विद्यार्थ्यांचीही मिटींग घेऊन त्यांना परीक्षेच्या गांभीर्याबाबत व निकाल उंचावण्याबाबत मार्गदर्शन करावे.
5. निकालाचे बुकलेट तयार करावे. संबंधित विभागांना निकालाची एक प्रत द्यावी.
6. मूल्यांकनातील 15 टक्केपेक्षा अधिकच्या फरकाची विषयनिहाय माहिती पुढील बैठकीत ठेवावी.
7. एम.सी.क्यू प्रश्नपत्रिकेतील उत्तरांचे पर्याय विशिष्ट पद्धतीने विद्यार्थ्यांना समजतील अशी जर प्रश्नपत्रिका जाणीवपूर्वक कोणते प्राध्यापक काढत असतील तर अशा प्राध्यापकांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी.
8. परीक्षेमध्ये एकाचवेळी सब्जेक्टिव्ह व ऑब्जेक्टिव्ह प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना वाटप करू नयेत.
9. मूल्यांकनासाठी उत्तरपत्रिका देण्यापूर्वी परीक्षा क्रमांकावर मास्किंग करावे
10. अंतर्गत / सत्रांत यापैकी कोणत्या परीक्षेत नापासचे प्रमाण अधिक आहे याची संख्यात्मक माहिती पुढील बैठकीत ठेवावी.

डॉ. आर. एल. कावळे :-

1. विद्यापीठामार्फत झालेल्या गतवर्षीच्या प्रथम सत्रांत परीक्षेशी या निकालाची तुलना करून पुढच्या बैठकीत याबाबत माहिती द्यावी.
2. निकालाची प्रत प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक विभागप्रमुखांनी आपापली बैठक घेऊन आपल्या विषयाचा निकाल कमी लागल्याबाबतची कारणे कोणती आहेत याचा लेखी अहवाल प्राचार्यांना सादर करावा।
3. बहिस्थ प्राध्यापकांचे मूल्यांकनाबाबतचे काम समाधानकारक नसल्यास पुढील वर्षी त्यांना बोलावू नये.
4. एम. पी. केसमधील विद्यार्थ्यांना समितीसमोर बोलावून आपली बाजू मांडण्याची संधी द्यावी.
5. एम. पी. केसबाबत आपले नियम तयार होईपर्यंत प्रस्तुत विद्यापीठाच्या नियमानुसार कार्यवाही करावी.

डॉ. पी. एन. सगर : घटक परीक्षेचे मूल्यांकनही CAP द्वारे झाल्यामुळे निकालावर परीणाम झाला आहे.

डॉ. एस. डी. साळूंके : प्रॅक्टिकलमुळे विज्ञान शाखेचा निकाल इतर शाखेपेक्षा उंचावला आहे

16.12.2013

निर्णय :

अ) पुढच्या आठवड्यात सलग दोन ते तीन दिवस निकाला संदर्भात नियमनिहाय विभागप्रमुख, विभागातील सर्व प्राध्यापकांसह बैठका घ्याव्यात. बैठकीसाठी प्राचार्य अनिरुद्ध जोशी सर व डॉ. आर. एल. काळे सर यांना बोलवावे.

ब) या परीक्षेतील एम. पी. केसमधील विद्यार्थ्यांच्या प्रकरणांवर निर्णय घेण्यासाठी प्राचार्य, परीक्षा नियंत्रक, अतीरिक्त परीक्षा नियंत्रक, प्रा. डॉ. एस. बी. वाघमारे, प्रा. डॉ. एम. एच. गव्हाणे यांची समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीने त्वरीत बैठक घेऊन या विद्यार्थ्यांबाबत कार्यवाहीचा निर्णय घ्यावा.

क) प्रथम सत्रांत परीक्षेचे एक बुकलेट (निकाल रजिस्टर) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास पाठविण्यात यावे.

विषय क्र. 03. द्वितीय सत्रातील घटक परीक्षा व सत्रांत परीक्षेचे नियोजन.

परीक्षा विभागाने निश्चीत केलेल्या द्वितीय सत्रातील पेपर सेटींग, प्रथम, द्वितीय घटक परीक्षा व सत्रांत परीक्षा व निकालाच्या संभाव्य तारखांची माहिती प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी बैठकीत दिली. यावर खालीलप्रमाणे सदस्यांनी आपली मते व्यक्त केली.

01. अभ्यासक्रम शिकवण्याचे वेळापत्रक (Teaching Plan) विद्यार्थ्यांना सत्र आरंभ होताच द्यावे. वेळापत्रकाप्रमाणे अभ्यासक्रम पुर्ण होत आहे की नाही याबाबत प्रशासनाने वेळोवेळी विद्यार्थी व विभागप्रमुखांकडून फिडबॅक घ्यावा.

02. 12 वी बोर्ड परीक्षा, गॅदरींग, विद्यापीठ परीक्षा आदींचा विचार करता प्रत्यक्ष Teaching साठी किती दिवस मिळतात याचे नियोजन करावे. 03. शिक्षकनिहाय तासिकांचे रेकॉर्ड ठेवावे.

04. विद्यापीठ परीक्षाचे शेड्यूल बघून आपल्या परीक्षेच्या तारखा ठरवाव्यात.

निर्णय :

अ) दोन्ही घटक परीक्षांच्या उत्तरपत्रीका विद्यार्थ्यांना पाहण्यासाठी वाटप कराव्यात.

ब) मुल्यांकनाबाबत तक्रार असेल तर लिखीत फी आकारुन बहीस्थ प्राध्यापकाकडून उत्तरपत्रीकेचे फेरमुल्यांकन करावे.

क) परीक्षा फॉर्म भरतेवेळी विद्यार्थ्यांकडून असे हमीपत्र भरून घ्यावे की, परीक्षा फॉर्म भरला म्हणजे परीक्षेस बसू दिल

ड) दि. २५ ते २७ मे २०१४ दरम्यान निकाल घोषीत करुन दि. १५ जून २०१४ च्या जवळपास अतीरिक्त परीक्षा घेण्यात यावी. परीक्षा विभागाने तयार केलेल्या नियोजनाची एक प्रत कार्यालयास देण्यात यावी.

विषय क्र. ०४ : द्वितीय सत्रातील घटक व सत्रांत परीक्षेचे व प्रश्नपत्रीकेचे स्वरुप ठरविणे.

द्वितीय सत्रापासून घटक परीक्षा ०१ व ०२ पुर्णपणे सब्जेक्टिव्ह व सत्रांत परीक्षा पुर्णपणे ऑब्जेक्टिव्ह स्वरुपाची घ्यावी असा प्रस्ताव परीक्षा विभागाने ठेवला यावर खालीलप्रमाणे सदस्यांनी मते व्यक्त केली.

डॉ. एस. डी. जाधव : सदर प्रस्ताव स्विकारण्यायोग्य आहे. कारण यामुळे निकाल लवकर लागण्यास मदत होईल व मूल्यांकनाकरीता प्राध्यापकास मानधन देण्यासाठीच्या खर्चात बचत होईल.

प्राचार्य अनिरुध्द जाधव : पारदर्शकपणा येत असल्यामुळे प्रस्ताव स्विकारण्यायोग्य आहे. सब्जेक्टिव्ह व ऑब्जेक्टिव्ह स्वरुपातील किती प्रश्न विचारायचे याचा निर्णय विषयनिहाय संबंधित विभाग प्रमुखांनी घेण्यास हरकत नसावी. गुणानुक्रमे पहिल्या पाच विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रीका सर्व विद्यार्थ्यांच्या अवलोकनासाठी ग्रंथालयात ठेवाव्यात.

डॉ. आर. एल. काळे, डॉ. पी. एन. पवार : या पॅटर्नमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होत नाही. सत्रांत परीक्षेत सब्जेक्टिव्ह व ऑब्जेक्टिव्ह पॅटर्नचे प्रमाण समान असावे. प्रत्येक वर्ष अखेरीस वर्गनिहाय गुणानुक्रमे पहिल्या तीन विद्यार्थ्यांना पारितोषीक देण्यात यावे.

निर्णय :

अ) द्वितीय सत्रापासून दोन्ही घटक परीक्षा पुर्णपणे सब्जेक्टिव्ह राहतील.

ब) सत्रांत परीक्षेत ५० टक्के सब्जेक्टिव्ह व ५० टक्के ऑब्जेक्टिव्ह स्वरुपाचे प्रश्न असतील.

क) पेपर सेटींगसाठी संबंधित विषयाचा विभागप्रमुख, त्याच विषयाचा एक प्राध्यापक व एक वरीष्ठ प्राध्यापक असतील. एकूण तीन पेपर सेट तयार केले जातील.

अशाप्रकारे बैठकीचे कामकाज होऊन

अतिरीक्त परीक्षा नियंत्रक प्रा. बी. एस. चंदनशी यांनी उपस्थितांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीचा समारोप

18-12-2013

राजर्षी शाहू महाविद्यालय स्वायत्त प्रथम सत्रांत परीक्षेतील एम. पी. केसमधील विद्यार्थ्यांच्या प्रकरणांवर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी गठीत समितीची बैठक प्राचार्य डॉ. एस बी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्यांच्या कक्षात दि. 18-12-2013 रोजी सकाळी ठीक 11.00 घेण्यात आली. बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ. क्र. | नांव | सही |
| --- | --- | --- |
| 01. | डॉ. एस. बी. जाधव | [signature] |
| 02. | प्रा. व्ही. आर. दाडगे | [signature] |
| 03. | प्रा. बी. एस. चंद्रबन्सी | [signature] 18/12/2013 |
| 04. | प्रा. डॉ. एस बी. वाघमारे | [signature] |
| 05. | प्रा. डॉ. एम. एच. गव्हाणे | [signature] 18/12/2013 |

बैठकीचे प्रास्ताविक परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी केल्यानंतर बैठकीस रितसर सुरुवात करण्यात आली.

विषय क्र. 01 :- एम. पी. केसमधील विद्यार्थ्यांवर कार्यवाहीबाबत.

बैठकीत अतीरिक्त परीक्षा नियंत्रक प्रा. बी. एस. चंद्रबन्सी यांनी अशी माहिती दिली की, स्वायत्त महाविद्यालयांतर्गत दिवाळी 2013 मध्ये झालेल्या प्रथम सत्रांत परीक्षेत बी. ए. प्रथम वर्ष वर्गातील (1) कु. सुरवसे ज्योती शंकर व (2) श्री. वांगे कृष्णकांत गुणवंत हे दोन विद्यार्थी परीक्षा दालनात गैरमार्गाचा अवलंब करुन परीक्षा देत असल्याचे निदर्शनास आले आहे. परीक्षा दालनात विद्यार्थ्यांकडून जप्त करण्यात आलेले आक्षेपार्ह साहित्य बैठकीसमोर सादर करण्यात आले. सदर साहित्याचे सदस्यांनी अवलोकन केले. या दोन्ही विद्यार्थ्यांना बैठकीसमोर बोलावून घेण्यात आले. सदर साहित्य त्यांचेच आहे का याबाबत विचारणा केली असता हे साहित्य त्यांनी परीक्षा दालनात आणल्याचे सर्व सदस्यांसमोर कबूल केले.

सदस्य डॉ. एस. बी. वाघमारे व डॉ. एम. एच. गव्हाणे यांनी सूचना केली की, याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांसह समितीसमोर प्रत्यक्ष बोलावून त्यांचे याबाबतचे म्हणणे परत एकदा ऐकून घ्यावे. सूचना देऊनही समितीसमोर ते अनुपस्थीत राहिल्यास याबाबत

18.12.2013

त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

निर्णय : या दोन्ही विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकासह समिती-समोर शुक्रवार दि. 20-12-2013 रोजी उपस्थित राहण्याविषयी कळवावे.

अशाप्रकारे बैठकीचे कामकाज होऊन उपस्थित सदस्यांचे अतीरिक्त परीक्षा नियंत्रक प्रा. बी. एस. चंद्रवंशी यांनी आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीचा समारोप करण्यात आला.

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय
लातूर

20.12.2013

स्वायत्त महाविद्यालयांतर्गत हिवाळी 2013 मध्ये आलेल्या पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या प्रथम सत्रांत परीक्षेत परीक्षा दालनात गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांवर कार्यवाही करण्याबाबत गठीत समितीची शुक्रवार दिनांक 20.12.2013 रोजी सकाळी ठीक 11.00 वा. प्राचार्यांच्या कक्षात प्राचार्य डॉ. एस. बी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजीत करण्यात आली. बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

01. डॉ. एस. बी. जाधव
02. प्रा. व्ही. आर. दाडगे
03. प्रा. बी. एस. चंद्रवन्सी
04. डॉ. एस. बी. वाघमारे
05. डॉ. एम. एच. गव्हाणे.

बैठकीचे प्रास्ताविक परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी केल्यानंतर बैठकीस रितसर सुरुवात करण्यात आली.

विषय क्र. 01. एम. पी. केसमधील विद्यार्थी व पालकांचे म्हणणे ऐकुण घेणे.

दिनांक 18.12.2013 रोजी बैठकीत ठरल्यानुसार एम. पी. केस प्रकरणातील दोन्ही विद्यार्थी व पालकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी समिती सदस्य प्राचार्यांच्या कक्षात उपस्थित झाल्यानंतर 01. कु. सुरवसे ज्योती शंकर ही विद्यार्थीनी पालकासमवेत हजर झाली. विद्यार्थीनीकडून परीक्षा दालनात जप्त करण्यात आलेले साहित्याबाबत पालकासमक्ष विद्यार्थीनीस विचारणा करण्यात आली. हे साहित्य माझेच असल्याचे विद्यार्थीनीने कबुल केले. 02. एम. पी. केसमधील दुसरा विद्यार्थी बांगे कृष्णकांत गुणवंत हा स्वत: किंवा त्याचे पालक दुपारी 12.15 पर्यंतही समितीसमोर हजर झाले नाहीत.

यावर सर्व सदस्यांनी साधक-बाधक चर्चा करून अशाप्रकारच्या गैरमार्गाचा परीक्षा दालनात विद्यार्थ्याकडून वापर होऊ नये यासाठी कठोर शिक्षा होणे आवश्यक असल्याचे मत बनले त्यानुसार खालीलप्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

निर्णय : या दोन्ही विद्यार्थ्यांनी परीक्षा दालनात गैरमार्गाचा

20.12.2013

विद्यार्थ्यांची या परीक्षेतील सर्व पेपरची संपादणूक (WPC) रद्द करावी असे सर्वानुमते ठरले.

अशाप्रकारे बैठकीचे कामकाज होऊन उपस्थित सदस्यांचे अतीरिक्त परीक्षा नियंत्रक प्रा. बी. एस. चंद्रबन्सी यांनी आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगी बैठकीचा समारोप करण्यात आला.

प्राचार्य
राजर्षी [illegible] महाविद्यालय
[illegible]

05-02-2014

स्वायत्त महाविद्यालय परीक्षा मंडळाची बैठक बुधवार दि. 05 फेब्रुवारी 2014 रोजी सकाळी ठीक 11.00 वा. प्राचार्यांच्या कक्षात आयोजीत करण्यात आली.

बैठकीस खालील सदस्य उपस्थीत होते.

01 डॉ. आर. एल. कावळे

| अ.क्र | नांव | सही |
|---|---|---|
| 01. | डॉ. एस. बी. जाधव | |
| 02. | डॉ. पी. एन. सगर | |
| 03. | डॉ. एस. डी. सांळूके | |
| 04. | प्रा. व्ही. आर. याडगे | |
| 05. | प्रा. बी. एस. चंद्रवन्सी | |
| 06. | | |
| 07. | | |

परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर याडगे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केल्यानंतर विषयपत्रीकेतील विषयानुसार बैठकीत खालील विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

विषय क्र 01. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचन.

परीक्षा मंडळाची यापूर्वीची बैठक दि. 16.12.2013 रोजी संपन्न झाली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त वाचन परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. याडगे यांनी केले. त्यात विषय क्र 02 मध्ये ठरल्यानुसार प्रथम सत्रांत परीक्षा निकालाचे बुकलेट (निकाल रजिस्टर) अद्यापपर्यंत विद्यापीठास पाठविले नाहि, ते त्वरीत पाठवावे असे ठरले, तसेच विषय क्र 03 मधील निर्णय क्र 5 नुसार द्वितीय सत्र परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर दि. 15 जून 2014 च्या जवळपास अतीरिक्त परीक्षा घेण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यात पुढीलप्रमाणे सुधारणा करावी असे सर्वानुमते ठरले. प्रथम सत्रांत परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची द्वितीय सत्रांत परीक्षेसोबत परीक्षा घ्यावी. अशाप्रकारे चर्चा होऊन मागील बैठकीतील इतिवृत्तास एकमताने मंजूरी देण्यात आली.

विषय क्र 02. सेमिस्टर एण्ड परीक्षा प्रश्नपत्रीका स्वरुप ठरवणे.

शै. वर्ष 2013-14 मधील द्वितीय सत्रापासून सत्रांत (सेमिस्टर एण्ड) परीक्षेत 50% एमसीक्यू व 50% सब्जेक्टिव्ह स्वरुपाचे प्रश्न ठेवण्याचा निर्णय मागील बैठकीत झालेला [illegible] 15 [illegible] परीक्षेसाठी 15 प्रश्न राहतील

05-02-14

15 गुणांच्या सत्रोत्तर प्रश्नपत्रिकेचे स्वरूप खालीलप्रमाणे ठेवावे असा निर्णय घेण्यात आला.

प्रश्न 1 ला : चार पैकी दोन सोडवा (प्रत्येकी 03 गुण) गुण 06
प्रश्न 2 रा : दोन पैकी एक सोडवा गुण 04
प्रश्न 3 रा : दोन पैकी एक सोडवा गुण 05

एकूण गुण 15

पदवी परीक्षेच्या 30 गुणांच्या सत्रांत परीक्षेसाठी एकूण दीड तासाचा वेळ राहील त्याची पुढीलप्रमाणे विभागणी राहील. 15 गुणांच्या एमसीक्यू परीक्षेसाठी 25 मिनीटांचा वेळ राहील तर उर्वरीत 15 गुणांच्या सत्रोत्तर परीक्षेसाठी 65 मिनीटांचा वेळ राहील.
विद्यार्थ्याकडून एमसीक्यू उत्तरपत्रीका स्विकारल्यानंतरच सत्रोत्तर प्रश्नपत्रीका वाटप केल्या जातील.
पदव्युत्तर वर्गासाठी प्रश्नपत्रीकेतील गुणांचे स्वरूप पदवी वर्गाच्या प्रमाणे राहील.
पदव्युत्तर वर्गासाठी 60 गुणांच्या सत्रांत परीक्षेसाठी एकूण दोन तासांचा वेळ राहील त्याची पुढीलप्रमाणे विभागणी राहील. 30 गुणांच्या एमसीक्यू परीक्षेसाठी 45 मिनीटांचा वेळ राहील. उर्वरीत 30 गुणांच्या सत्रोत्तर परीक्षेसाठी एक तास 15 मिनीटांचा वेळ राहील.
विषय क्र 03 अंतर्गत परीक्षेत (युनिट टेस्ट - प्रथम, द्वितीय) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यासाठी 30 गुणांची एकच एमसीक्यू परीक्षा घेणे.
या विषयावर साधक-बाधक चर्चा होऊन विद्यार्थ्यांचे हीत लक्षात घेता असे ठरले की प्रथम सत्रातील प्रथम, द्वितीय किंवा दोन्ही युनिट टेस्टमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी 30 गुणांची 30 एमसीक्यू प्रश्नांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारीत एकच परीक्षा घ्यावी. ही परीक्षा पुढच्या सत्रातील द्वितीय युनिट टेस्ट परीक्षेसोबत घेतली जावी असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 04 : कला शाखेतील भूगोल व संख्याशास्त्र ऐच्छिक विषयातील प्रात्यक्षिक पेपरच्या 50 गुणांसाठी
02 तासांचा कालावधी [illegible]

05.02.14

कला शाखेच्या वैकल्पिक पेपरच्या 50 गुणांसाठी एकूण 03 क्रेडीट निश्चीत करण्यात आलेले आहेत. भूगोल व संगणकशास्त्र विषयासाठी प्रत्येक सेमिस्टरमध्ये प्रात्यक्षिकच्या 50 गुणांच्या एक पेपर अतीरिक्त असल्यामुळे या प्रात्यक्षिक पेपरसाठी 02 क्रेडिट प्रथम सत्रांत परीक्षेत देण्यात आलेले आहेत यास मान्यता देऊन यापुढील परीक्षेसाठी या विषयाच्या प्रात्यक्षिक पेपरच्या 50 गुणांसाठी 02 क्रेडिट ठेवण्यास एकमताने मान्यता देण्यात आली.

विषय क्रमांक 05 : संगीत विषयाच्या प्रात्यक्षिक पेपरसाठी क्रेडिट निश्चीत करणे.

संगीत वैकल्पिक विषयास प्रात्यक्षिक असले तरीही प्रत्येक सेमिस्टरसाठी पेपरची एकूण संख्या इतर वैकल्पिक विषयाप्रमाणेच आहे. प्रथम व द्वितीय वर्षासाठी प्रत्येकी दोन पेपरपैकी एक तात्वीक व एक प्रात्यक्षिकच्या पेपर असतो त्यामूळे संगीत विषयाच्या प्रात्यक्षिक पेपरच्या 50 गुणांसाठी इतर तात्वीक ~~क~~ ~~पेप~~ पेपरप्रमाणेच 03 क्रेडिट ठेवण्यात यावेत असे ठरले.

विषय क्र. 06 : वाणिज्य शाखेच्या ॲडऑन कोर्ससाठी 03 क्रेडिट कायम करणे.

स्वायत्त महाविद्यालयांतर्गत प्रत्येक शाखेत ॲडऑन कोर्से सुरू करण्यात आले आहेत. प्रत्येक ॲडऑन कोर्स एकूण 50 गुणांच्या व त्यासाठी 02 क्रेडिट असे प्रमाण सर्व शाखेसाठी निश्चीत करण्यात आले होते. वाणिज्य शाखेतील अनिवार्य इंग्रजी व द्वितीय भाषा वगळून इतर सर्व 50 गुणांच्या पेपरसाठी 03 क्रेडिट आहेत. कला व विज्ञान शाखेच्या तुलनेत या शाखेतील एकूण पेपरची संख्या कमी असते. पदवीच्या एकूण क्रेडिटची किमान मर्यादा योग्य रितीने राखण्यासाठी उपप्राचार्य डॉ. पी. एन. सगर यांनी वाणिज्य शाखेतील ॲडऑन कोर्ससाठी 03 क्रेडिट दिले जावेत असा प्रस्ताव मांडला त्यावर चर्चा होऊन केवळ वाणिज्य शाखेच्या ॲडऑन कोर्ससाठी दिलेले 03 क्रेडिट यापुढेही कायम ठेवावेत असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रं. 07: कला, विज्ञान आयटी, बीटी शाखेतील ॲड ऑन कोर्ससाठी 02 क्रेडिट कायम करणे.

स्वायत्त महाविद्यालयांतर्गत प्रत्येक शाखेत ॲड ऑन कोर्स सुरु करण्यात आले आहेत. ॲड ऑन कोर्स एकूण 50 गुणांचा व त्यासाठी 02 क्रेडिट असे प्रमाण यापूर्वी निश्चीत करण्यात आले होते त्यात वरील शाखेतील ॲड ऑन कोर्सच्या क्रेडिटमध्ये कसलाही बदल करण्याची आवश्यकता नसल्याचे सर्व सदस्यांचे मत बनले यानुसार कला विज्ञान, आयटी, बीटी शाखेतील ॲड ऑन कोर्ससाठी यापूर्वी ठरल्याप्रमाणे 02 क्रेडिट कायम ठेवावेत असे ठरले.

विषय क्रं. 08: परीक्षा पद्धती/क्रेडिट आदी बाबतची माहिती समन्वयक प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी देणे.

स्वायत्त महाविद्यालयास अनुसरुन परीक्षा पद्धती/क्रेडिट आदी विषय आपल्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी नविन असल्याने याबाबतची विद्यार्थ्यांना परीक्षापूर्वीच माहिती होणे आवश्यक आहे. परीक्षा विभागाने व प्रशासनाने परीक्षा पद्धती/क्रेडिट/हजेरी याबाबत वेळोवेळी घेतलेले निर्णय लगेच समन्वयक प्राध्यापकांना कळवावेत या प्राध्यापकांनी याची माहिती विद्यार्थ्यांना वर्गात द्यावी तसेच परीक्षा विभागातील व विद्यार्थ्यांच्या नोटीस बोर्डवरही याबाबतचे निर्णय लावले जावेत असे सर्वानुमते ठरले.

अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळेचे विषय.

अ) परीक्षा शुल्काबाबतचा निर्णय अनुत्तीर्ण विद्यार्थी:

परीक्षा शुल्काबाबतचा निर्णय स्वायत्त महाविद्यालयाच्या वित्त समितीने घेतलेला आहे. त्यानुसार नियमित विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारले जात आहे. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकडून किती शुल्क आकारावे याबाबत बैठकीत साधक-बाधक चर्चा होऊन असे ठरले की विद्यापीठाच्या प्रचलीत नियमानुसार अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकडून शुल्क घेण्यात यावे.

अशाप्रकारे बैठकीचे कामकाज होऊन परीक्षा नियंत्रक

प्राचार्य [illegible]

10-04-2014

स्वायत्त महाविद्यालयाच्या परीक्षा मंडळाची बैठक लेखी पूर्वसूचना दिल्यानुसार गुरुवार दि. 10-04-2014 रोजी दुपारी ठीक 04.00 वा. आयोजित करण्यात आली. बैठकीस खालील सदस्य उपस्थीत होते.

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| 1) | प्राचार्य अनिरुध्द जाधव | [signature] |
| 2) | डॉ. आर एल. कावळे | [signature] |
| 3) | डॉ. एस. बी. जाधव | [signature] |
| 4) | डॉ. पी. एन. सगर | [signature] |
| 5) | डॉ. एस. डी. साळुंके | [signature] 10/4/2014 |
| 6) | प्रा. व्ही. आर. दाडगे | |
| 7) | प्रा. बी. एस. चंद्रवन्सी | [signature] 10.4.2014 |

बैठकीचे प्रास्ताविक परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी केल्यानंतर विषयपत्रीकेतील विषयानुसार बैठकीत खालील विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

विषय क्र. 01. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचन.

परीक्षा मंडळाची यापूर्वीची बैठक दि. 05-02-2014 रोजी संपन्न झाली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त वाचन परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी केले. त्यावर साधक - बाधक चर्चा होवून ते एकमताने मंजूर करण्यात आले.

विषय क्र. 02. अंतर्गत व बहि:स्थ परीक्षकाकडून उत्तरपत्रि-कांचे मूल्यांकन करणे बाबत.

मागील सत्रांत परीक्षेतील उत्तरपत्रीकांचे अंतर्गत व बहि:स्थ परीक्षकाकडून मूल्यांकन करण्यात आले होते. यात काही विषयाच्या बाबतीत बहि:स्थ परीक्षकाकडून वेळेवर प्रतीसाद मिळाला नाही, त्यामुळे निकाल वेळेवर घोषीत करण्यास अडचण निर्माण झाली. अंतर्गत व बहि:स्थ परीक्षकांच्या मूल्यांकनातही बरीच तफावत दिसून आली. अंतर्गत

सोयीचे आहे. या सर्व बाबींचा विचार करता एप्रिल 2014 पासूनच्या पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या सत्रांत परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन फक्त अंतर्गत परीक्षकांकडून करून द्यावे असे सदस्यांचे मत बनले.

निर्णय : एप्रिल 2014 पासून होणाऱ्या पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या सत्रांत परीक्षेतील नियमीत व बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रीकांचे मूल्यांकन फक्त अंतर्गत परीक्षकाकडून करून द्यावे असा एकमताने निर्णय घेण्यात आला.

विषय क्र. 03 : तीसऱ्या परीक्षकाकडून 15% पेक्षा अधिक फरकाच्या उत्तरपत्रिकांचे फेरमूल्यांकन करणे बाबत.

एप्रिल 2014 परीक्षेपासून फक्त अंतर्गत परीक्षकाकडून मूल्यांकन होणार असल्यामूळे या विषयावर विचार व चर्चा करण्यात आली नाही.

विषय क्र. 04 : मूल्यांकन करताना उत्तरपत्रीकेवर चिन्हांकन (✓, x) व गुणदान करणेबाबत.

यापूर्वी अंतर्गत व बहीस्थ परीक्षकाकडून मूल्यांकन होत असल्यामूळे उत्तरपत्रीकेवर चिन्हांकन करण्यास परवानगी नव्हती. यापूढील परीक्षेपासून फक्त अंतर्गत परीक्षकाकडून मूल्यांकन होत असल्यामूळे उत्तरपत्रीकेवर चिन्हांकन करण्यास परवानगी द्यावी असे सर्व सदस्यांनी सूचविले.

निर्णय : उत्तरपत्रीकेचे मूल्यांकन करताना चिन्हांकन (✓, x) व गुणदान करण्यास परीक्षकांना परवानगी देण्याचा एकमताने निर्णय घेण्यात आला.

विषय क्र. 05 : उत्तरपत्रीकेतील सर्व प्रश्नांच्या संपादित गुणांची बेरीज पूर्णांकात असणे बाबत.

काही प्रश्नांच्या / उपप्रश्नांच्या उत्तरासाठी अपुर्णांकात गुण दिले जातात. अशाप्रकारे अपुर्णांकात दिलेल्या गुणांची बेरीज करताना प्रत्येक प्रश्नाच्या (उपप्रश्नाच्या नव्हे) बेरजेचे रुपांतर पुर्णांकात करावे असे सदस्यांनी सुचविले.

निर्णय: अपुर्णांक गुणांचे पुर्णांकात रुपांतर करताना ते प्रश्नवाईज करावे.

विषय क्र. 06. विहीत नमुन्यातील गुणदान यादीत सुधारणा करण्याबाबत.

उत्तरपत्रिकेचे मूल्यांकन केल्यानंतर गुणदान यादी देण्याचा सध्याचा नमुना विस्तृत स्वरुपाचा आहे. यापुढे उत्तरपत्रीकेवरच गुणदान केले जाणार असल्यामुळे या नमुन्यात सुधारणा करावी असे सदस्यांनी सुचविले त्यानुसार पुढीलप्रमाणे गुणदान यादीचा नमुना असावा असे सर्वानुमते ठरले.

~~निर्णय: अपुर्णांक गुणांचे पु~~

निर्णय: परीक्षा क्रमांक, प्राप्त गुण (अंकात), प्राप्त गुण (अक्षरी) या तीन कॉलममध्ये गुणयादी स्विकारावी असा निर्णय घेण्यात आला.

विषय क्र. 07. एम.फिल भूगोल अभ्यासक्रमाबाबत.

सन 2013-14 पासून पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्षातील सर्व वर्गाचे कामकाज उदा. प्रवेश, पात्रता, परीक्षा आदी कामकाज स्वायत्त महाविद्यालयास अनुसरुन सुरु आहे. परंतु एम.फिल भूगोल वर्गाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठामार्फत पूर्ण झाली आहे, व अभ्यासक्रमही या वर्षापुरता विद्यापीठाच्या जशाच्या तसा स्विकारण्यात आला आहे. एम. फिल भूगोलची प्रवेश प्रक्रिया जरी विद्यापीठामार्फत पूर्ण झाली असली तरी त्यापुढील कामकाज उदा. पात्रता क्र., परीक्षा घेणे आदी कामकाज स्वायत्त महाविद्यालयास अनुसरुन केले जाणार आहे, अशा प्रकारचे पत्र महाविद्यालयामार्फत दि. 19-10-2013 रोजी विद्यापीठास पाठविण्यात आले आहे.

निर्णय: एम.फिल भूगोलचे परीक्षाविषयक सर्व कामकाज महाविद्या

विषय क्र. 08: परीक्षेच्या वेळ वाढवून देण्यासंदर्भात आलेल्या निवेदणाबाबत.

पदवी व पदव्युत्तर सत्रांत परीक्षेसाठी यापूर्वी परीक्षा विभागाच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आलेला आहे, व त्यानुसार सध्या कार्यवाही सुरु आहे. एम. एस्सी फिजीक्स (फोटोनिक्स) प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दि. 19-03-2014 रोजी सत्रांत परीक्षेच्या वेळ 15 मिनीटांनी वाढवून मिळावा म्हणून प्राचार्यांकडे निवेदण सादर केले आहे. यावर सदस्यांनी मत व्यक्त केले की, सर्व पदव्युत्तर वर्गासाठी परीक्षेच्या वेळ समान ठेवण्यात आला आहे. यामध्ये यावर्षी बदल करणे योग्य होणार नाही, त्यामुळे या विषयावर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

निर्णय: पदव्युत्तर परीक्षेच्या सत्रांत परीक्षेच्या सध्याच्या वेळेत कोणताही बदल करावयाचा नाही असे सर्वानुमते ठरले.

अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय:

अ) परीक्षा विभागात प्रुफ रिडर नियुक्तीबाबत

परीक्षा विभागात प्राध्यापकांकडून पेपर सेटींग करुन दाखल झालेल्या प्रश्नपत्रीका संगणकावर टाईप केल्यानंतर त्याचे प्रुफ रिडींग करणे आवश्यक असते, यासाठी भाषा विषयाच्या प्राध्यापकांना प्रुफ रिडर म्हणून नियुक्त्या दिल्या आहेत परंतु काही प्राध्यापक आपल्याकडे अधिक कार्यभार आहे असे म्हणून प्रुफ रिडींगचे काम करण्यास वेळ नाही असे म्हणत परीक्षा विभागात वेळेवर येत नसल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे परीक्षेच्या नियोजीत कामात अनियमितता येण्याची शक्यता निर्माण होण्याचे प्रसंग निर्माण होत आहेत, अशी माहिती परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी बैठकीत दिली. यावर प्राचार्य अनिरुध्द जाधव सर यांनी सूचना केली की, या कामासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांनाही नियुक्त्या देण्यास [illegible]

सर्व प्राध्यापकांना काही मानधन देता येते का ते पहावे. यावर डॉ. आर. एल. कातके यांनी सूचना केली की, प्रुफ रिडर म्हणून बाहेरचे प्राध्यापक/कर्मचारी नेमणे परीक्षेच्या गोपनियतेच्या दृष्टीने योग्य होणार नाही.
निर्णय : महाविद्यालयातील प्राध्यापकांनाच प्रुफ रिडर म्हणून नियुक्त्या द्याव्यात असे सर्वानुमते ठरले.

ब) परीरक्षक (costodian) म्हणून नियुक्तीबाबत.

एप्रिल 2014 परीक्षेसाठी प्रा. एस. डी. भंडारे यांची कस्टोडीयन म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. परंतू त्यांचे सध्या पीएचडी चे काम चालू आहे व ते लवकर पूर्ण करण्याचे आदेश त्यांच्या मार्गदर्शक गाईडनी दिले असल्यामुळे कस्टोडियन म्हणून दिलेली नियुक्ती रद्द करावी असा विनंती अर्ज त्यांनी दिला आहे. यावर चर्चा होवून त्यांना कस्टोडियन म्हणून दिलेल्या जबाबदारीतून मुक्त करून त्यांच्याऐवजी प्रा. डॉ. डी. व्ही. राजे यांना कस्टोडियन म्हणून नियुक्ती द्यावी असे सर्वानुमते ठरले.

क) आय.टी. व बी.टी. विभागासाठी 50 गुणांसाठी 04 क्रेडिट दिले असल्याबाबत.

स्वायत्त महाविद्यालयांतर्गत बी.एस्सी जनरल विषयातील 50 गुणांसाठीच्या एका पेपरसाठी 02 क्रेडिट देण्यात आलेले आहेत व ते व्यावहारीक व संयुक्तीक आहेत. आय. टी. व बी. टी विभागातील 50 गुणांच्या एका पेपरसाठी 04 क्रेडिट दिल्याचे परीक्षा विभागाच्या निदर्शनास आले. याबाबत आय. टी. व, बी.टी. विभागास कल्पना दिल्यानंतर आय. टी. विभागाने यात दुरूस्ती करून 50 गुणांच्या एका पेपरसाठी 02 क्रेडिट दिले आहेत परंतू बी.टी. विभागाने अद्यापपर्यंत यात दुरूस्ती केलेली नाही. यावर चर्चेअंती असे ठरले की, बी.टी. विभागातील 50 गुणांच्या एका पेपरसाठी 02 क्रेडिट दिले जातील याप्रमाणे त्वरीत दुरूस्ती करण्याची सूचना द्यावी.

ड) अनिवार्य इंग्रजी व द्वितीय भाषा विषयाचे क्रेडिट बाबत.

पदवी प्रथम व द्वितीय वर्षासाठी अनिवार्य इंग्रजी व द्वितीय भाषा या विषयाच्या 50 गुणांच्या एका पेपरसाठी 02 क्रेडिट दिलेले आहेत. विज्ञान शाखेच्या ऐच्छिक विषयातील 50 गुणांच्या एका पेपरसाठी 02 क्रेडिट दिलेले आहेत त्यामुळे विज्ञान शाखेच्या सत्रांत परीक्षेतील गुणपत्रकात गुण, क्रेडिट, सीजीपीए यांचे परस्परांशी प्रमाण जुळते परंतु वाणिज्य व कला शाखेतील ऐच्छिक विषयातील 50 गुणांच्या एका पेपरसाठी 03 क्रेडिट दिले असल्यामुळे गुण, क्रेडिट व सीजीपीए यांच्या परस्परांशी प्रमाणात भिन्नता येते. अशी भिन्नता येणे विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने मारक ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे यावर अधिक अभ्यास करून विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही या दृष्टीने गुण व क्रेडिटचे प्रमाण निश्चीत करावे. गुण, क्रेडिट व सीजीपीए यांची परस्परांशी समानता येण्यासाठी आवश्यक असेल तर अनिवार्य इंग्रजी व द्वितीय भाषेचे फक्त कला व वाणिज्य शाखेसाठी 50 गुणांच्या एका पेपरसाठी 03 क्रेडिट देण्याबाबत अधिक माहिती घेवून यावर विचार करावा असे सदस्यांनी मत व्यक्त केले. यावर आजच्या बैठकीत कोणताहि निर्णय घेण्यात आला नाहि.

ई) ॲडव्हान्स डिप्लोमा इन एनसीसी बाबत

आपल्या महाविद्यालयास स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त झाल्यामूळे युजीसी व एनसीसी कार्यालयाकडून सन 2013-14 पासून विशेष बाब म्हणून ॲडव्हान्स डिप्लोमा इन एनसीसी हा डिप्लोमा कोर्स सुरु करण्याची सूचना दिल्यानुसार सदर कोर्सबाबत एनसीसी ऑफिसर, प्राचार्य, उपप्राचार्य यांच्या संयुक्त बैठकीत या कोर्सचा अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला आहे. या कोर्सबाबतची सद्यस्थीती व पूढील नियोजनाबाबतची माहिती डॉ. ओ. व्ही. शहापूरकर यांनी बैठकीत दिली. या कोर्सच्या अद्यापपर्यंत नियमीत तासिका व प्रात्यक्षिकहि पूर्ण करण्यात आलेले आहे. फक्त या कोर्समध्ये सहभागी विद्यार्थी/विद्यार्थीनींची यादी कार्यालय

या कोर्ससाठी 04 क्रेडिट देण्याचे प्रारंभी निश्चीत करण्यात आले आहे परंतु त्यात सुधारणा करून 08 क्रेडिट द्यावेत असे आजच्या बैठकीत ठरविण्यात येत आहे, व हा कोर्स फक्त या चालू बॅचपुरताच राहील. पुढील वर्षापासून या कोर्सऐवजी एनसीसी विषयावरील एक ऐच्छिक विषयच सुरू करण्यात येईल असे बैठकीत निश्चीत करण्यात आले.

उ) मूल्यशिक्षण अभ्यासक्रमाचे अंतर्गत/सत्रांत परीक्षेमधून एकत्रीत अथवा स्वतंत्र उत्तीर्णतेचे प्रमाण निश्चीत करणे.

स्वायत्त महाविद्यालयातील नियमीत विषयासाठी अंतर्गत व सत्रांत या दोन्ही परीक्षेत स्वतंत्रपणे उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. मूल्यशिक्षण या अभ्यासक्रमाचे स्वरूप इतर नियमीत विषयापेक्षा भिन्न स्वरूपाचे असल्याने नियमीत विषयास लागू असलेले अंतर्गत व सत्रांत परीक्षेत स्वतंत्रपणे उत्तीर्ण होण्याचा नियम जशाच्या तसा मूल्यशिक्षण अभ्यासक्रमास लागू करू नये अशी शिफारस मूल्यशिक्षण अभ्यासमंडळाने केली आहे.

मूल्यशिक्षण अभ्यासमंडळाने केलेल्या शिफारशीनुसार या अभ्यासक्रमाच्या अंतर्गत व सत्रांत या दोन्ही परीक्षेत प्राप्त केलेले गुण एकत्रीत करून उत्तीर्णतेसाठी 50 पैकी आवश्यक गुण विद्यार्थ्याने प्राप्त केले तर त्यास उत्तीर्ण घोषीत करावे यास एकमताने मान्यता देण्यात आली.

ऊ) मॉडेल आन्सर की बाबत

सध्या पेपर सेटींगवेळी प्रश्नपत्रीकेचे प्रत्येक पेपरचे एकूण तीन सेट काढले जातात व त्यासोबतच प्रत्येक प्रश्नपत्रीकेची मॉडेल आन्सर की संबंधित पेपर सेटरकडून घेतली जाते. यावर बऱ्याच प्राध्यापकांची अशी मागणी आहे की, परीक्षेसाठी प्रश्नपत्रीकेचा एकच सेट वापरात येतो त्यामुळे प्रश्नपत्रीकेच्या सेटींगवेळीच मॉडेल आन्सर की घेण्याऐवजी प्रत्यक्ष परीक्षा सुरू झाल्यानंतर प्रश्नपत्रीकेचा जो संच वापरला जाईल त्याच प्रश्नपत्रीकेची मॉडेल

10-04-2014

प्राध्यापकांकडून घ्यावी. प्राचार्य अनिरुध्द जाधव सरांनीही यास आपली सहमती दर्शविली. यावर परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी माहिती दिली की, प्राध्यापकाकडून घेत असलेल्या तिन्ही प्रश्नपत्रीका संचाचा आपल्याकडून वापर होत असतो त्यात मुख्य परीक्षेसाठी एक दुसरा नापास विद्यार्थ्यासाठी तर ~~तिसरा~~ तिसरा सेच विशेष बाबीमुळे काही विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचा निर्णय आला तर त्यावेळी वापरला जाऊ शकतो. परीक्षा होताच प्रश्नपत्रीकेची मॉडेल आन्सर की परीक्षा काळात घेणे परीक्षा विभागास गैरसोयीचे आहे. यावर साधक-बाधक चर्चा होऊन कोणताही निर्णय घेण्यात आला नाही.

परीक्षा विभागास परीक्षेसंदर्भातील कामाबाबत आलेल्या चांगल्या / वाईट अनुभवाचा वार्षिक अहवाल परीक्षा नियंत्रकांनी प्रशासनास सादर करावा असे उपस्थीत सदस्यांनी मत व्यक्त केले.

अशाप्रकारे बैठकीचे कामकाज होऊन परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी उपस्थित सदस्यांचे आभार व्यक्त करून अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीचा समारोप करण्यात आला.

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय
लातूर

17-06-2014

स्वायत्त महाविद्यालय परीक्षा मंडळाची बैठक मंगळवार दि. 17 जून 2014 रोजी सकाळी ठीक 11.30 वा. प्राचार्य डॉ. एस. बी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्यांच्या कक्षात आयोजीत करण्यात आली.

बैठकीस खालील सदस्य उपस्थीत होते.

| अ.क्र | नाव | सही |
| --- | --- | --- |
| 1) | डॉ. एस. बी. जाधव - चेअरमन | [signature] |
| 2) | डॉ. शांतीनाथ बनसोडे - सदस्य | [signature] |
| 3) | डॉ. बाबासाहेब गोरे - " | [signature] |
| 4) | डॉ. पी. एन सगर - " | [signature] |
| 5) | डॉ. एस. डी. साळूंके - " | [signature] |
| 6) | प्रा. बी. एस. चंद्रवंशी - " | [signature] |
| 7) | प्राचार्य अनिरूद्ध जाधव - निमंत्रीत | [signature] |
| 8) | डॉ. आर. एल. कावळे - निमंत्रीत | [signature] |
| 9) | श्री. व्ही. डी. धुमाळ - निमंत्रीत | [signature] |
| 10) | प्रा. व्ही. आर दाडगे - सदस्य सचिव | |

परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केल्यानंतर विषयपत्रीकेतील विषयानुसार बैठकीत खालील विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

विषय क्र. 01: मागील बैठकीचे इतिवृत्त वाचन:

परीक्षा मंडळाची मागील बैठक दि. 10-04-2014 रोजी संपन्न झाली. या बैठकीत परीक्षा मंडळाच्या पहिल्या बैठकीपासूनचे म्हणजे दि. 25-07-2013 ते दि. 10-04-2014 पर्यंत परीक्षा मंडळाच्या एकूण सात बैठका पार पडल्या. या सर्व बैठकांचे थोडक्यात इतिवृत्त वाचन व परीक्षा मंडळाने राबविलेल्या विशेष योजनांची माहिती परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी बैठकीसमोर सादर केली. यावर चर्चा करताना सदस्यांनी पुढीलप्रमाणे आपली मते व्यक्त केली.

अ) सत्रांत परीक्षेसाठीचे प्राध्यापकांकडून मॉडेल आन्सर की घेण्याबाबत

सध्या पेपर सेटींग करतेवेळीच प्राध्यापकांकडून लीनही

प्राध्यापकांची असहमती आहे. कारण सध्या तीनही पेपरची आन्सर की द्यावी लागत आहे. यासाठी बराच वेळ जात आहे. त्यामुळे परीक्षा झाल्यानंतर नेमक्या त्याच पेपरची दोन दिवसात मॉडेल आन्सर की द्यावी. परीक्षा होताच दोन दिवसात मॉडेल आन्सर की घेण्याबाबत डॉ. बनसोडे सर, प्राचार्य अनिरुद्ध जाधव सर, डॉ. पी. एन. सगर व डॉ. एस. डी. साळुंके आदी सदस्यांनी सहमती दर्शविली.

डॉ. आर. एल. कावळे, प्राचार्य डॉ. एस. बी. जाधव व परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी असे मत व्यक्त केले की, पेपर सेटींगवेळीच मॉडेल आन्सर की देणे सोयीचे ठरते कारण परीक्षा होताच मॉडेल आन्सर की देण्यासाठी संबंधित सर्वच प्राध्यापक वेळेवर उपस्थित होत नाहीत, त्यामुळे मूल्यांकनासाठी उशीर होतो व निकाल वेळेवर लावण्यास अडचण निर्माण होते. यावर साधक-बाधक चर्चा होवून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

निर्णय : 1) पेपर सेटींगवेळीच मॉडेल आन्सर की चे (स्कीम ऑफ मार्किंगसह) तीन सेट प्राध्यापकांकडून घ्यावेत.

2) पेपर सेटींगसाठी प्राध्यापकांना वेळ वाढवून द्यावा.

3) परीक्षेदिवशी संबंधित विषयाच्या प्राध्यापकांनी पहिल्या अर्ध्या तासात परीक्षा विभागात उपस्थित राहून प्रश्नपत्रीका पहावी व त्यात काही चुका असतील तर त्या दुरुस्त करुन विद्यार्थ्यांना परीक्षा हॉलमध्ये लगेच त्याची माहिती द्यावी.

ब) घटक चाचणी परीक्षेचे पेपर सेटींग बाबत

प्रत्येक सत्रात दोन घटक चाचणी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षेच्या स्वरुपाविषयी माहिती परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाडगे यांनी बैठकीसमोर दिली. सध्या घटक चाचणी परीक्षेसाठीही तीन पेपरसेट घेतले जातात यावर चर्चा होवून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

निर्णय : 1) घटक चाचणी परीक्षेसाठी फक्त दोनच पेपरसेट घ्यावेत.

2) घटक चाचणी परीक्षा पूर्वीप्रमाणेच परीक्षा विभागामार्फत घ्यावी.

3) घटक चाचणी परीक्षा सकाळ-दुपार घ्यावी व यादिवशी तासिका ठेवू नयेत.

4) घटक चाचणी परीक्षे [illegible]

या विषयाच्या अनुषंगाने सदस्य डॉ. बनसोड सरांनी असे मत व्यक्त केले की, विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षणाबाबत जाणीव-जागृती व्हावी या उद्देशाने त्याचे वर्गातील, महाविद्यालय व परिसरातील तसेच प्राध्यापकांशी असलेले वर्तन, सामाजिक कार्यातील सहभाग, रक्तदान, अपघातात मदत करणे, प्रामाणिकपणा, व्यक्तीमत्व विकास यासाठीही काही गुण देण्याचा प्रयत्न करावा व या बाबींची माहितीपुस्तीकेत माहिती द्यावी.

महाविद्यालय राबवत असलेल्या क्रेडिट सिस्टीमबाबतची माहिती अतिरिक्त परीक्षा नियंत्रक प्रा. बी. एस. चंद्रबन्सी यांनी बैठकीसमोर दिली. यावर सर्व सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

अशाप्रकारे मागील बैठकीतील इतिवृत्तावर चर्चा होवून त्यास सर्व सदस्यांनी एकमताने मंजूरी दिली.

विषय क्र 02 : शै. वर्ष 2013-14 मधील प्रथम व द्वितीय सत्र परीक्षा निकालाचा आढावा.

स्वायत्त महाविद्यालयांतर्गत शै. वर्ष 2013-14 मध्ये महाविद्यालयातील परीक्षा विभागामार्फत पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्ष वर्गाच्या घटक चाचणी व सत्रांत परीक्षा घेण्यात आल्या. सत्रांत परीक्षेच्या निकालाचे वाचन अतिरीक्त परीक्षा नियंत्रक प्रा. बी. एस. चंद्रबन्सी यांनी केले. यात एम. ए. अर्थशास्त्र वगळता इतर सर्व वर्गाचा निकाल समाधानकारक आहे. हजेरीसाठीही गुण ठेवल्यामुळे त्याचा थेट निकालावर परिणाम झालेला आहे. परीक्षा संपल्यानंतर पूर्वसूचना देवून मूल्यांकन झालेल्या सर्व उत्तरपत्रीका विद्यार्थ्यांना दाखवण्यात आल्या, त्यात विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन संबंधित प्राध्यापकांनी केल्यानंतर मूल्यांकनास अंतीम रुप देवून निकाल जाहिर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. गोपनियतेसोबतच पारदर्शकपणा व नियोजनाप्रमाणे वेळेवर परीक्षा घेणे, निकाल लावणे आदी बाबी पूर्ण केल्याबद्दल सदस्यांनी समाधान व्यक्त केले. सर्व वर्गाचे निकाल किमान 75% पेक्षा अधिक लागावेत या दृष्टीने विद्यार्थ्यांची तयारी करुन घ्यावी असेही सदस्यांनी मत व्यक्त केले.

बी. कॉम. व एम. कॉम. वर्गासाठी टॅली हा ॲडऑन कोर्स सुरु करण्यात आलेला आहे. शै. वर्ष 2013-14 मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांनी अगोदरच टॅली हा कोर्स बाहेरुन पूर्ण केल्यामुळे त्यांना महाविद्यालयातील टॅली कोर्समधून सूट देण्यात आली आहे. महाविद्यालयातील टॅलीच्या तासिकांना त्यांची

अनुत्तीर्ण आले आहेत. यात विद्यार्थ्यांचा काहीही दोष नसल्याने अशा विद्यार्थ्यांना हजेरीचे गुण देवून त्यांच्या गुणपत्रीका दुरुस्त करुन द्याव्यात असे सर्वानुमते ठरले व यापुढे बाहेरुन जरी टेली कोर्स पुर्ण केला असला तरी सन 2014-15 पासून विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून टेली करणे बंधनकारक राहील असा निर्णय घेण्यात आला.

विषय क्र 03 : सन 2013-14 मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेतील प्रश्नपत्रीकेच्या दर्जा तपासणीबाबत.

स्वायत्त महाविद्यालयास अनुसरुन महाविद्यालयात होणाऱ्या सर्व परीक्षेच्या प्रश्नपत्रीका आपल्या महाविद्यालयामार्फत काढल्या जात आहेत. इतर महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी या प्रश्नपत्रीकेचे अवलोकन करतात. या प्रश्नपत्रीकेच्या दर्जा चांगला व सर्वसमावेशक असावा, काठीण्य पातळी फारच सोपी नसावी, त्यामुळे वेळोवेळी या प्रश्नपत्रीकेच्या दर्जाची तपासणी परवायमा समितीमार्फत करावी असे परीक्षा नियंत्रक प्रा. व्ही. आर. दाढगे यांनी बैठकीसमोर सांगीतले. यावर सदस्य डॉ. बनसोडे सरांनी असे मत व्यक्त केले की, प्रश्नपत्रीका दर्जासंबंधी पेपर सेटींग अगोदर प्राध्यापकांची कार्यशाळा घ्यावी. या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी एमपीएससी, आयआयटी, बँकींग आदी परीक्षेचे पेपरसेटींग केलेल्या प्राध्यापकांना बोलवावे. प्रश्नपत्रीका आढावा सीमतीवर मात्र शहरातील प्राध्यापकांना घेवू नये. याबाबत सर्व सदस्यांनी साधक - बाधक चर्चा करुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

निर्णय ! 1. परीक्षा संपल्यानंतर बोर्ड ऑफ स्टडीज सदस्यांची बैठक घ्यावी व यामध्ये प्रश्नपत्रीकेच्या दर्जाबाबत आढावा घेण्यात यावा.

विषय क्र 04: शै. वर्ष 2014-15 परीक्षाविषयक नियोजनास मान्यता देणे बाबत.

शै. वर्ष 2014-15 मध्ये संपन्न होणाऱ्या घटक चाचणी, सत्रांत परीक्षा, पेपर सेटींग, निकाल आदीबाबतचे वार्षिक नियोजन तयार करण्यात आले आहे. या नियोजनाचे वाचन अतिरीक्त परीक्षा नियंत्रक प्रा. बी. एस. चंद्रवन्शी यांनी केले. यावर सदस्यांनी पुढीलप्रमाणे सूचना केल्या.

बनसोडे सर : प्राध्यापकांनी टीचींगचे मायक्रो प्लॅनींग करावे व त्याची एक प्रत विभागप्रमुख ...

प्राध्यापक, विभागप्रमुख, प्राचार्य व संस्थेकडेही असावी.
डॉ. आर. एल. कारके सर : ॲकॅडमीक व परीक्षाविषयक नियोजनाच्या तारखांचा एक बोर्ड तयार करुन महाविद्यालयाच्या दर्शनी भागात कायमच्या लावावा, हीच माहिती विद्यार्थ्यांना कॅलेंडर स्वरूपात देता आली तर द्यावी.
अशाप्रकारे चर्चा होवून शै. वर्ष २०१४-१५ च्या परीक्षाविषयक नियोजनास एकमताने मान्यता देण्यात आली.

विषय क्र. 05 : शै. वर्ष 2014-15 परीक्षाविषयक जमा-खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.
शै. वर्ष २०१४-१५ चे परीक्षाविषयक जमा-खर्चाचे अंदाजपत्रक परीक्षा नियंत्रक प्रा. बी. आर. दाडगे यांनी बैठकीसमोर सादर केले, हा विषय आर्थिक बाबींशी संबंधित असल्याने या बैठकीत यावर अधिक चर्चा करण्याची आवश्यकता नाही असे सदस्यांनी सूचवले व सादर केलेल्या अंदाजपत्रकास एकमताने मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ०६ : पेपर सेटींग व मूल्यांकनाबाबत प्राध्यापकांची कार्यशाळा आयोजित करण्याबाबत
पेपर सेटींग व मूल्यांकनाबाबत सर्व प्राध्यापकांचे योग्य ते प्रबोधन व्हावे व प्रश्नपत्रीकेचा दर्जा उत्तम राहण्यासाठी प्राध्यापकांची कार्यशाळा आयोजीत करावी व या कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून एमपीएससी, आयआयटी, बँकींग आदी क्षेत्रात पेपरसेटींगचे काम करणाऱ्या तज्ञ प्राध्यापकांना बोलवावे असे सदस्यांनी मत व्यक्त केले. यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.
निर्णय : पेपरसेटींग, मॉडेल आन्सर की व मूल्यांकनाबाबत एक दिवसाची कार्यशाळा आयोजीत करण्यात यावी.

विषय क्र. 07 : शै. वर्ष 2014-15 परीक्षा प्रणालीचे धोरण ठरविणे बाबत.
शै. वर्ष २०१३-१४ मध्ये राबविण्यात आलेल्या परीक्षा प्रणाली, पेपर सेटींग, मूल्यांकन आदीबाबतची माहिती अतिरीक्त परीक्षा नियंत्रक प्रा. बी. एस. चंद्रवन्शी यांनी बैठकीसमोर मांडली. चालू शै. वर्ष २०१४-१५ साठी उत्तीर्णतेचा निकष अंतर्गत व सत्रांत परीक्षा [illegible]

घ्यायची की परीक्षा विभागामार्फत घ्यायची यावर सदस्यांनी चर्चा केल्यानंतर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

निर्णय : १) उत्तीर्णतेचा निकष अंतर्गत व सत्रांत परीक्षेसाठी स्वतंत्र असावा, तसेच घटक चाचणी परीक्षा ही परीक्षा विभागामार्फतच घ्यावी.

२) पुढील वर्गात प्रवेश देण्याची विद्यार्थ्यांना संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने उन्हाळी परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी जूनमध्ये अतिरिक्त परीक्षा घ्यावी.

विषय क्र. ०४ : परीक्षेचे नियम व परिनियम तयार करण्याबाबत.

स्वायत्त महाविद्यालयास अनुसरून परीक्षेबाबत नियम तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी महाविद्यालयाने एक तज्ञ समितीचे गठन करावे. तज्ञ समितीने मसुदा तयार करावा व सदर मसुदा परीक्षा मंडळाच्या पुढील बैठकीत विचारार्थ ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय :

अ) एम. पी. केस विद्यार्थ्यांवरील कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता.

प्रथम सत्रांत परीक्षेत एम. पी. केसमधील विद्यार्थ्यांवर परीक्षा विभागामार्फत समिती नेमून कार्यवाही करण्यात आली आहे. या केलेल्या कार्यवाहीस परीक्षा मंडळाच्या आजच्या बैठकीत एकमताने कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

अशाप्रकारे बैठकीचे कामकाज होवून अतिरिक्त परीक्षा नियंत्रक प्रा. श्री. एस. चंद्रवंशी यांनी उपस्थित सदस्यांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीचा समारोप करण्यात आला.

प्राचार्य
[illegible]

24-07-2014

स्वायत्त महाविद्यालय परीक्षा मंडळाची बैठक लेखी पुर्वसूचना दिल्यानुसार गुरुवार दि. 24-07-2014 रोजी सकाळी ठीक 11.30 वा. प्राचार्य डॉ. एस. बी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्यांच्या कक्षात आयोजीत करण्यात आली.

बैठकीस खालील सदस्य उपस्थीत होते.

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| 1) | डॉ. एस. बी. जाधव - चेअरमन | [signature] |
| 2) | डॉ. शांतिनाथ बनसोडे - सदस्य | [signature] 24/07 |
| 3) | डॉ. बाबासाहेब गोरे - " | [signature] |
| 4) | डॉ. पी. एन. सगर - " | [signature] |
| 5) | डॉ. एस. डी. साळुंके - " | [signature] |
| 6) | प्रा. व्ही. आर. दाडगे - " | [signature] |
| 7) | प्राचार्य अनिरुद्ध जाधव - " | [signature] |
| 8) | डॉ. आर. एल. कावळे - " | [signature] |
| 9) | प्रा. बी. एस. चंद्रवन्सी - परीक्षा नियंत्रक | |

परीक्षा नियंत्रक प्रा. बी. एस. चंद्रवन्सी यांनी बैठकीचे प्रास्ताविक केल्यानंतर विषयपत्रिकेतील विषयानुसार खालील विषयावर चर्चा होवून निर्णय घेण्यात आले.

विषय क्र. 01. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचन.

परीक्षा मंडळाची मागील बैठक दि. 17-06-2014 रोजी संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त वाचन परीक्षा नियंत्रक प्रा. बी. एस. चंद्रवन्सी यांनी केले यावर उपस्थीत सदस्यांनी साधक-बाधक चर्चा केली. यापुढील बैठकीत मागील बैठकीचे सविस्तर इतिवृत्त वाचन न करता बैठकीत घेतलेल्या निर्णयावर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाचे वाचन थोडक्यात करावे अशी सूचना सदस्यांनी केली. अशाप्रकारे मागील बैठकीच्या इतिवृत्तास एकमताने मंजुरी देण्यात आली.

विषय क्र. 02. द्वितीय/तृतीय वर्ष प्रवेशासाठी समानतेचे विषय/नियम निश्चीत करणे.

या विषयावर सदस्यांनी खालीलप्रमाणे मते व्यक्त केली.

अ) हा अत्यंत महत्वाचा विषय असल्याने याबाबतची चर्चा

